॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

1990 'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

# परिपत्रक क्रमांक : ६५/२०२१

**(अत्यंत महत्वाचे)**

प्रति,

१. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.

२. विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक/विभागांचे प्रमुख,कबचौउमवि., जळगाव.

३. मानद संचालक, विद्यापीठाचे सर्व उपकेंद्रे

**विषय :-** महाराष्ट्र राज्यात व देशांतर्गत कोविड-१९ विषाणूच्या संसर्गामुळे बाधित झालेल्या व्यक्तींची संख्या मोठ्याप्रमाणात वाढत असल्यामुळे जळगाव जिल्ह्यातील महाविद्यालये / परिसंस्था बंद ठेवणेबाबत.

**संदर्भ:-** १) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हादंडाधिकारी, जळगाव यांचे कार्यालयाकडील आदेश क्र.दंडप्र-०१/कावि/ ५७७/२०२१ दि.२२/०२/२०२१

२) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक ६३/२०२१ जा.क्र. कबचौउमवि/२/कोरोना (कोविड-१९)/३७/ २०२१ दि. १०/०२/२०२१

उपरोक्त संदर्भीय क्र.०१ (एक) वर नमूद मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव यांच्या कार्यालयाकडील आदेशाची प्रत ह्या परिपत्रकासोबत जोडलेली आहे. कृपया संदर्भीय आदेशाचे अवलोकन व्हावे व त्यामध्ये नमूद केलेल्या बाबीची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील वर्ग सुरू करण्याबाबत महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक क्र.संकीर्ण २०२१/प्र.क्र.६/विशि-३, दि.०३ फेब्रुवारी,२०२१ अनुसार विद्यापीठे व त्यांच्यशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग दि.१५ फेब्रुवारी,२०२१ पासून सुरू करण्यास मान्यता देण्यात आली होती.

त्याचप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.५ नोव्हेंबर,२०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जागेची उपलब्धता पाहून, ५०टक्के पर्यंत विद्यार्थ्यांना रोटेशन पध्दतीने वर्गात प्रवेश देण्यात यावा अशा सूचना प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने संदर्भ क्र. ०२ (दोन) अनुसार विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये / परिसंस्थांमधील वर्ग दि. १५ फेब्रुवारी, २०२१ पासून सुरू करण्याबात विद्यापीठाने सविस्तर परिपत्रक क्र. ६३/२०२१ जा.क्र.कबचौउमवि/२/कोरोना(कोविड-१९)/३७/२०२१ दि.१०.०२.२०२१ निर्गमित केले होते.

परंतु, कोविड-१९ चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता, मा. जिल्हाअधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, जळगाव यांचे संदर्भ क्र.१ (एक) वरील आदेश विद्यापीठास प्राप्त झाले आहेत. करीता **जळगाव जिल्ह्यातील** विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था, विद्यापीठ प्रशाळा व उपकेंद्रे यांना सूचित करण्यात येते की, संदर्भ क्र.०२ (दोन) अनुसार आपण नियमित महाविद्यालयातील वर्ग सुरू करण्याबाबत केलेली कार्यवाही **दि. ०६ मार्च,२०२१ पर्यंत** स्थगीत करावी व ऑनलाईन कार्यवाही सुरू ठेवावी.

K.B.C. NORTH MAHARASHTRA UNIVERSITY JALGAON-425001

पुढे..२.. वर

उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत, दुरध्वनी क्र : ०२५७ - २२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७ - २२५८४०३,४०६

Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257 - 2258428, 2258429

Fax No. 0257 - 2258403, 406 Email : registrar@nmu.ac.in Web : www.nmu.ac.in

तसेच, जळगाव जिल्हा वगळता धुळे व नंदूरबार जिल्ह्यातील महाविद्यालये/परिसंस्था व उपकेंद्रे स्थानिक प्रशासन म्हणजेच जिल्हाधिकारी / तहसिलदार /तालुका अधिकारी यांचे आदेशानुसार महाविद्यालय सुरू ठेवण्याबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावरून करावी.

**तथापि, दि.२२ फेब्रुवारी, २०२१ ते ६ मार्च, २०२१ पर्यंत या कालावधीत घेण्यात येणाऱ्या सर्व पूर्वनियोजित ऑनलाईन परीक्षा सुरू ठेवाव्यात. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

कोरोना विषाणूच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याबाबत महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आदेश, नियमावली (SOPs) नुसार कुलसचिव कार्यालयाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आदेश लागू राहतील. तसेच महाराष्ट्र शासनाकडून लॉकडाऊन कालावधीत लागू केलेले निर्बंध शिथील करण्याबाबत वेळोवेळी दिलेले निर्देश पुढील आदेश होईपावेतो लागू राहतील.

वरील प्रमाणे करोना विषाणू संसर्गाच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, जळगाव यांनी निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे आपल्या स्तरावरून आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

K.B.C. NORTH MAHARASHTRA UNIVERSITY JALGAON-425001

आदेशावरून,

(प्रा.भा.व्यं.पवार)

**प्र.कुलसचिव**

**सोबत :-** मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हादंडाधिकारी, जळगाव यांचे कार्यालयाकडील आदेशाची प्रत.

जा.क्र.कबचौउमवि/२/ कोरोना(कोविड-१९)/ ६३ /२०२१

दि. २३/०२/२०२१

**प्रत माहितीसाठी.**

१. सन्माननीय सर्व व्यवस्थापन परिषद सदस्य, कबचौउमवि., जळगाव.

२. विविध विद्याशाखांचे मा. अधिष्ठाता, कबचौउमवि., जळगाव.

३. मा. कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि., जळगाव.

४. मा. प्र-कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि., जळगाव.

५. मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

६. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव.

७.मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि, जळगाव.

८.मा.प्र.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव.

महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

**(गृह शाखा)**

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152

**ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

---

**वाचले** :- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005

2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च 2020
4. मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक 16/02/2021 रोजी झालेल्या व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे दिलेल्या निर्देशानुसार

---

**क्र दंडप्र-01/कावि/577/2021**

**दिनांक** 22/02/2021

## आदेश :-

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिंड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यात व देशांतर्गत कोविड-19 विषाणूच्या संसर्गामुळे बाधित झालेल्या व्यक्तींची संख्या मोठया प्रमाणात वाढत असल्याने खबरदारी घेण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक 16/02/2021 रोजी झालेल्या व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे निर्देश दिलेले आहेत. तसेच जळगांव जिल्हयात करोना संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणू संसर्गात अधिक वाढ होऊ न देता उपाययोजना राबवणे आवश्यक आहे आणि सदर संशयित व्यक्तीमुळे आपत्तीजन्य परिस्थिती जळगांव जिल्हयात उद्‌भवू नये यासाठी पूर्व तयारी करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, **मी. अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जळगांव** आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897 व फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 चे कलम 144 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन **संपूर्ण जळगांव जिल्हयाकरीता** करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनांचा भाग म्हणून **दिनांक 22/02/2021 ते दिनांक 06/03/2021 पावेतो** खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे

1) सर्व प्रकारच्या शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक व प्रशिक्षण केंद्रे, खाजगी शिकवणी क्लासेस, सर्व प्रकारचे कोचिंग क्लासेस बंद राहतील. तथापि विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उपस्थितीस बंदी असली तरी संबंधित शैक्षणिक आस्थापनांना ऑनलाईन शिक्षणाची सुविधा देता येईल. तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत ई-माहिती तयार करणे, उत्तरपत्रिका तपासणी करणे, निकाल घोषित करणे, ऑनलाईन शिक्षणाचे नियोजन व व्यवस्थापन करणे व तत्सम कामे करण्याकरीता संबंधित शाळा/महाविद्यालयात उपस्थित रहावे.
2) अभ्यासिका (लायब्ररी, वाचनालये) यांना केवळ 50 % क्षमतेच्या मर्यादेत सुरु ठेवता येतील.
3) सर्व प्रकारचे धार्मिक कार्यक्रम, जत्रा, यात्रा, उरुस, दिंडी व तत्सम धार्मिक कार्यक्रम यांना बंदी राहील.

4) सर्व धार्मिक स्थळे ही एका वेळेस केवळ 10 लोकांच्या मर्यादेच्या उपस्थितीत संबंधित पूजा-अर्चा या सारख्या विधीकरीता खुली राहतील.

5) सर्व प्रकारचे सिनेमागृहे, व्यायामशाळा, जलतरण तलाव, मनोरंजन पार्क्स, बगीचे, नाट्यगृहे, प्रेक्षकगृहे व इतर संबंधित ठिकाणे बंद राहतील.

6) सर्व प्रकारचे सामाजिक, राजकीय, मनोरंजनात्मक, शैक्षणिक, सांस्कृतिक व तत्सम कार्यक्रमे यांना बंदी राहील. तसेच सर्व प्रकारच्या क्रिडा स्पर्धा, प्रदर्शने, मेळावे, संमेलने यांना बंदी राहील.

7) सर्व आठवडी बाजार बंद राहतील.

8) कायद्याव्दारे बंधनकारक असणाऱ्या वैधानिक सभांना केवळ 50 लोकांचे उपस्थितीच्या मर्यादेत परवानगी राहील.( तथापि याबाबत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांना सूचीत करणे आवश्यक राहील.) मात्र जिल्हा परिषद सर्व साधारण सभा व जळगांव शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा यांना उपस्थितीच्या संख्येच्या मर्यादेतून सूट राहील.

9) लग्न समारंभ, कौटुंबिक कार्यक्रम यांचे आयोजन करतांना या कार्यालयाकडून लागू करण्यात आलेल्या निर्बंधांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत 50 लोकांच्या उपस्थितीच्या मर्यादेचा भंग होणार नाही, याची संबंधितांनी गांभिर्याने दक्षता घ्यावी.

10) सर्व प्रकारच्या खाजगी आस्थापनांनी त्यांच्या आस्थापनेवरील सर्व कर्मचा-यांची वेळोवेळी आरोग्य तपासणी करुन घेणे, त्यांच्याकडून सोशल डिस्टन्सींग, मास्कचा वापर याबाबींचे पालन करुन घेणे बंधनकारक राहील. तसेच कोविड-19 ची लक्षणे दिसून येणा-या संशयित कर्मचा-यांची कोविड-19 RTPCR चाचणी करुन घेण्याची जबाबदारी संबंधित आस्थापनांची राहील.

11) जळगांव जिल्हयातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या ठिकाणी होणारी गर्दी पाहता, सदर ठिकाणी गर्दी नियंत्रित करणें, सर्व व्यक्तींनी चेह-यावर मास्क लावणे, सोशल डिस्टन्सींगचे पालन करणे तसेच सॅनिटाईजरचा वापर करणे व हात धुण्याची व्यवस्था उपलब्ध करुन देणे याची संपूर्ण जबाबदारी संबंधित सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती यांची राहील. सदर बाजार समितीच्या ठिकाणी भाजीपाला विक्री करणारे शेतकरी व खरेदी करणारे घाऊक व्यापारी यांनाच प्रवेश असेल. सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारे, कोणत्याही रिटेलर्स (किरकोळ व्यापारी) यांना प्रवेश असणार नाही. तसेच जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, जळगांव व सर्व सहायक निबंधक सहकारी संस्था यांनी संबंधित बाजार समितींच्या ठिकाणी वेळोवेळी भेटी देऊन कोविड-19 नियमावलीचे पालन होत असल्याबाबत खात्री करावी.

12) **संपूर्ण जळगांव जिल्हयात रात्री 10.00 वाजेपासून सकाळी 05.00 वाजेपर्यंत संचारबंदी (Night Curfew) घोषित करण्यात येत आहे.** मात्र या संचारबंदी दरम्यान आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित शासकीय आस्थापना, अत्यावश्यक वैद्यकीय सेवा देणारे घटक, संचारबंदीच्या कालावधीत कंपनीत जाणारे व येणारे कामगार ( तथापि संबंधित कामगारांना ओळखपत्र सोबत बाळगणे बंधनकारक राहील) , बाहेर गावाहून येणाऱ्या प्रवाशांना सुविधा देण्यासाठी ऑटोरिक्षा यांना मुभा राहील. मात्र ऑटोरिक्षामधून चालक वगळता केवळ दोन व्यक्तींनाच प्रवास करता येईल. तसेच आंतरजिल्हा प्रवासी वाहतूक व संबंधित आस्थापना उदा. पेट्रोलपंप, गॅरेजेस यांना देखील सूट राहील.

13) गर्दी जमवून करण्यात येणारी निदर्शने, मोर्चे, रॅली यांना बंदी राहील. मात्र केवळ 5 लोकांच्या उपस्थितीत स्थानिक पोलीस विभागाची परवानगी घेऊन संबंधित शासकीय विभागास निवेदन देता येईल.

सदरचा आदेश हा सर्व संबंधितांना नोटीस देऊन त्यांचे म्हणणे ऐकूण घेणे सद्यस्थितीत शक्य नसल्यामुळे एकतर्फी पारीत करण्यात येत आहे.

१६७/

**सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास सदर बाब ही भारतीय दंड संहिता, 1860 (45) चे कलम 188, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 51 ते 60 व फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 चे तरतुदीनुसार शिक्षेस पात्र राहील.**

सदरचा आदेश हा आज दिनांक 22/02/2021 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

**(अभिजीत राऊत)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जळगांव**

**प्रत :- मा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर.**
**प्रत** :- शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग नाशिक यांना माहितीसाठी
**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव
2. पोलीस अधिक्षक, जळगांव
3. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव
4. कुलसचिव, कवयित्री बहिणाबाई चौधरी उ.म.वि जळगांव
5. उपविभागीय दंडाधिकारी सर्व
6. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय जळगांव
7. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था जळगांव
8. कार्यकारी दंडाधिकारी सर्व
9. जिल्हा शल्य चिकीत्सक जळगांव
10. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव
11. जिल्हा क्रिडा अधिकारी, जळगांव
12. जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव
13. सहसंचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, जळगांव
14. शिक्षणाधिकारी (माध्यमिक/ प्राथमिक), जि प जळगांव
15. मुख्याधिकारी नगरपालिका / नगरपंचायत सर्व
16. सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती सर्व

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाची स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी द्यावी.